## संपादकीय

# वाया गेलेल्या औषधांची विल्हेवाट

दरवर्षी ५ जून रोजी एक संकल्पना घेऊन जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. यावर्षीची थीम आहे. 'जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचा अंत'. जरी प्लास्टिक, प्रदूषणास जबाबदार असणारा प्रमुख घटक असला तरी प्लास्टिकच्या बरोबरीने औषधे सुद्धा प्रदूषणास घातक ठरत आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढलेले आजार त्याचबरोबर माफक किमती, सहज उपलब्धता यामुळे आज चॉकलेट गोळ्यांसारखा औषधांचा वापर होतो आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. आपल्याकडे कालावधी संपलेली आणि न वापरलेली औषधे घरगुती कचऱ्यात फेकून तर कधी फ्लश करून त्यांची विल्हेवाट लावली केली जाते. अशा बेजबाबदार कृतीमुळे सक्रिय रासायनिक घटकपदार्थ भूजल आणि अन्न साखळीमध्ये प्रवेश करतात. माती, पाणी आणि अन्न यांच्या प्रदूषणाबरोबरच ही औषधे प्राण्यांच्या पोटात जाऊन त्यांच्या जीवाला धोका उद्भवतो. काही वर्षांपूर्वी मानवी मृतदेहातील मांस भक्षण करणारी गिधाडे मोठ्या प्रमाणात मृत्युमुखी पडली होती. मीमांसा करताना असे लक्षात आले की, 'डाक्लोफेनाक सोडियम' या दर्द निवारक रासायनिक घटकाचे मृत देहातील अंश पोटात गेल्याने गिधाडे मरण पावत आहेत.

जागतिक स्तरावरील दुसरी भीषण समस्या म्हणजे प्रतिजैविकांना उत्पन्न होत असलेला प्रतिरोध. प्रामुख्याने उदाहरण द्यायचे झाले तर प्रचलित औषधांना निष्प्रभ करणारे क्षयरोगाचे जीवाणू. काही वेळा कालावधी संपलेल्या औषधांचा गैरवापर अथवा पुनर्विक्री होते. त्यामुळे ती प्राणघातक ठरू शकतात. या पार्श्वभूमीवर केरळ राज्याने फेब्रुवारी महिन्यात राज्याच्या आरोग्यमंत्री वीणा जॉर्ज यांच्या हस्ते आपल्या देशातील पहिला 'n PROUD' म्हणजेच 'New Program on Removal of Unused Drugs' प्रकल्प कोझिकोडे शहरात कार्यान्वित करण्याचे ठरवले आहे. या प्रकल्पांतर्गत न वापरलेली व मुदतबाह्य औषधे गोळा करून त्यांची सुरक्षित आणि योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार आहे. यासाठी निळ्या रंगाचे कंटेनर कायमस्वरूपी शहरातील विविध ठिकाणी संकलनासाठी ठेवण्यात येणार आहेत. तसेच या कामी सेवाभावी व पर्यावरणासाठी पर्यावरणासाठी काम करणाऱ्या संस्थांना देखील सहभागी करून घेतले जाणार आहे. अगदी थेट घराघरातून सुद्धा ठरावीक दिवशी असे संकलन केले जाणार आहे.

औषधे ही जैववैद्यकीय कचरा प्रवर्गात मोडत असल्याने त्यांच्या विल्हेवाटीसाठी जैववैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९६ लागू होतो. या नियमांनुसार

१. पिवळ्या रंगाच्या बॉक्सेस किंवा क्लोरीनमुक्त प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये न वापरलेल्या व मुदतबाह्य औषधांचे विल्हेवाटीसाठी संकलन केले जाते.

२. उत्पादक किंवा विक्रेत्याला ही संकलित केलेली औषधे विल्हेवाटीसाठी परत दिली जातात.

३. प्रथम औषधांचे वेष्टन कापून ती पावडर स्वरूपात इन्सिनरेटरमध्ये जाळून टाकली जातात. कचऱ्यावर प्रक्रिया आणि त्याचे व्यवस्थापन करणाऱ्या युनिटला केंद्र व राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाची परवानगी असणे बंधनकारक आहे.

४. जमिनीत पुरून औषधांची विल्हेवाट लावणे ही सुद्धा एक सर्वसामान्य पद्धत आहे.

रुग्णालये, सरकारी व खासगी दवाखाने, प्रयोगशाळा, मेडिकल दुकाने, संशोधन करणाऱ्या संस्था यांमधील जैववैद्यकीय कचऱ्याची हाताळणी वरील पद्धतीने केली जाते. आजार बरा होणे, औषधांचा कालावधी पूर्ण होणे, उपचार पद्धतीमध्ये बदल, स्ट्रीप साईज, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय विकत घेता येणारी OTC औषधे अशा विविध कारणांमुळे आपल्या घरामध्ये न वापरलेली औषधे ही जमा होतच असतात. आपण घरामध्ये औषधांची साठवणूक करताना झाकण असलेला एक वेगळा बॉक्स सुरक्षित ठिकाणी ठेवावा. दर सहा महिन्यांनी बॉक्समधील औषधांची तपासणी करून त्यातील मुदतबाह्य औषधे तसेच पुनर्वापर करण्याची शक्यता नसलेली प्रिस्क्रिप्शनवरील औषधे वेगळी काढावी. आपल्या घराजवळील केमिस्ट किंवा एखादी संस्था अशी औषधे घेतात का याची माहिती काढावी. अन्यथा ती कापून, लेबल काढून एका पिशवीत घालून कचऱ्यात टाकावी.

आज औषधे ही आरोग्य सेवेवर होणाऱ्या खर्चाचा एक प्रमुख हिस्सा आहेत. आपल्याकडे वापरली न गेलेली व अंतिम तारीख न उलटलेली औषधे वापरण्यासाठी योग्य धोरणाचा अभाव आहे. प्रिस्क्रिप्शनवर मिळणारी पण न वापरलेली औषधे पुनर्वापरासाठी औषध कंपन्यांना परत पाठविण्यासाठी राष्ट्रीय धोरणात्मक मार्गाची गरज आहे. अमेरिकेत अशी प्रणाली

कार्यरत आहे. भारत औषध उत्पादनात जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. औषध उद्योगाची उलाढाल १.३ ट्रिलियन एवढी प्रचंड आहे. पण वर्षाला २७० कोटी रुपयांची औषधे मुदतबाह्य झाल्यामुळे फेकून दिली जातात. प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात एकीकडे गोरगरिबांना औषधे विकत घेणे परवडत नाही तर दुसरीकडे कोट्यवधी रुपयांची औषधे पाण्यात जात आहेत.

केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना ही राष्ट्रीय नियामक प्राधिकरण आहे. तिच्याद्वारे कालबाह्य व न वापरलेली औषधे यांचा गैरवापर व प्रतिजैविके प्रतिरोध होऊ नये म्हणून त्यांची शास्त्रशुद्धरीत्या विल्हेवाट लावण्यासाठी मार्गदर्शक धोरणे आखणीचे काम चालू आहे.

# 'पुरी' गावच्या महिला बचत गटांची पंढरीची वाट

## घोंगटा उत्पादनातून आर्थिक कमाई आणि पुण्य संचितही

मराठवाडा केसरी नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर, । पुरी ता. गंगापूर येथील महिलांनी तयार केलेल्या प्लास्टीकच्या घोंगट्या आता तयार झाल्या आहेत. त्या आता आळंदी ते पंढरपूर या वारीच्या मार्गावर विक्रीसाठी उपलब्ध होतील. व्यवसायाच्या निमित्ताने पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या वारकऱ्यांचे पावसापासून रक्षण करुन या महिलांनी पांडुरंग सेवेची अनोखी वाट शोधली आहे.



पुरी गावातील महिला ह्या महिला आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून बचत गटांमध्ये संघटीत झाल्या. आणि त्यांनी प्लास्टीक पासून घोंगट्या (पावसापासून रक्षण करणारे पारंपारिक प्रावरण) बनविण्याचा आणि त्या विकण्याचा व्यवसाय सुरु केला. सन २००७ पासून त्या हा व्यवसाय करीत आहेत. १४ बचत गटांच्या माध्यमातून ५० ते ६० महिला या व्यवसायाशी जोडल्या गेल्या आहेत. त्यापैकी एक रागिणी महिला बचत गट. सुनिता वसंत गिरी ह्या या गटाच्या अध्यक्ष आहेत.

असा असतो कच्चा माल

विविध उत्पादनांच्या पॅकींगसाठी प्रिंटेड प्लास्टीक पेपर वापरला जातो. हा पेपर आतून कोटींग असलेला असतो. त्याच्या वरच्या भागात उत्पादनाशी संबंधित माहिती छापलेली असते.

त्यातील छपाईत काहीतरी दोष असल्याने कंपन्यांकडून हा कागद रद्दबातल केलेला असतो. हा १५० ते २०० जीएसएम कागद ह्या महिला विकत घेतात. हाच त्यांचा कच्चा माल. हा माल बहुदा मुंबई किंवा गुजरातहून येतो. ५० रुपये किलो या दराने घेतलेल्या एक किलो कच्च्या मालापासून ५ घोंगट्या तयार होतात. त्या किमान ५० ते ६० रुपये प्रति घोंगटी या दराने वारकऱ्यांना विकल्या जातात.

वारकऱ्यांच्या पसंतीस उतरलेल्या घोंगट्या

वारकऱ्यांन्या पारंपारिक गोणपाट अथवा घोंगडी (मेंढीच्या लोकरीपासून बनवलेली) पासून बनवलेल्या घोगट्यांऐवजी ही घोंगटा अधिक योग्य वाटते. कारण ही वजनाला हलकी असते. त्यामुळे डोक्यावर घेऊन चालत जाणे सहज शक्य होते. वारकऱ्यांसोबत असलेली थैलीही त्यात सहज सांभाळली जाते. शिवाय पाऊस उघडल्यावर सहज घडी करुन थैलीत बाळगता येते. रात्री झोपतांना अंथरुणासाठीही वापरता येते.

शिलाई ते सिलींग

आधी ह्या महिला घोंगटा शिलाई मशिनवर शिवत असत. आता त्यांनी सिलिंग मशिन आणली आहे. त्याद्वारे घोंगटीची दोन टोके यंत्रावर चिकटवली जातात. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढला आहे. यंदा ह्या महिलांनी ८ टन कागद मागवला आहे. घोंगट्यांसोबत त्या याच कागदाची ताडपत्रीही बनवतात. ही ताडपत्री शेतकरी वर्ग आपल्या शेतीमालाला झाकून ठेवण्यासाठी वापरतात. आतापर्यंत ४ टन कागदाची ताडपत्री यंदा विक्री झाली सुद्धा. आता लवकरच घोंगट्या विक्रीसाठी आळंदीकडे रवाना होतील. काही व्यापारी सुद्धा हा माल विकत घेऊन जातात.

माविमंची भुमिका

दरवेळी ह्या महिला माविमकडून अर्थसहाय्य घेतात आणि त्याद्वारे कच्चा माल खरेदी करतात. त्यातून घोंगट्या तयार करुन दरवर्षी त्या विक्रीसाठी नेतात आणि नफा कमावून त्यातून कर्ज फेड करतात. आतापर्यंत २० लाख रुपयांचे कर्ज त्यांनी घेतले आहे. त्याची त्या नियमित फेड करत असतात. दरवर्षी त्यांना ५० टक्के रक्कम नफा म्हणून शिल्लक राहते. वारीच्या कालावधीतच विक्री होत असल्याने चार महिने आधीपासून ते कामाला लागतात. वारीचा महिनाभर विक्री करुन आपल्या घरी परततात. पदरी असतो नफा आणि वारकऱ्यांची पर्यायाने पांडुरंगाची सेवा केल्याचे संचित.





# 'स्टॉप डायरिया' मोहीम प्रभावीपणे राबवा- अपर जिल्हाधिकारी अडकूणे

मराठवाडा केसरी नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर। पावसाळ्यात होणारे संसर्गजन्य आजार लक्षात घेता बालकांच्या आरोग्यासाठी 'स्टॉप डायरिया' मोहीम प्रभावीपणे राबवावी,असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूणे यांनी दिले.

'स्टॉप डायरीया' संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. दयानंद पोवळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अभय धानोरकर यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात दि.१६ जून ते ३१ जुलै या कालावधीत 'स्टॉप डायरिया' मोहीम राबवली जाणार आहे. यामध्ये प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात याबाबतचे प्रशिक्षण, घरोघरी जाऊन स्वच्छतेचे महत्व ,हात धुण्याची योग्य पद्धत याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. उपचारासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यासाठीचे निर्देश यावेळी देण्यात आले. डायरीया लागण झाल्यापासून त्यांना योग्य उपचार औषधे यासाठी शून्य ते पाच वय वर्ष मुलांचे सर्वेक्षण करून त्यांना झिंक आणि ओआरएस चे दोन पॅकेट त्याचप्रमाणे स्वच्छतेविषयी समुपदेशन अशा कार्यकर्तेद्वारे करण्यात येणार आहे.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांमध्ये हात धुण्याचे प्रात्यक्षिक त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्याचे ही नियोजन करण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे समन्वयक यांनी सांगितले. प्रतिकारशक्तीसाठी लसीकरण यामध्ये मिझर रूबेला याचे लसीकरण मोहीम प राबवून प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून बालकांचे प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. व प्रत्येक तालुका स्तरावरून पावसाळ्यातील आजाराविषयी वेळोवेळी निदान आणि उपचार करण्याबाबत आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचे यावेळी डॉ.अभय धानोरकर यांनी सांगितले.

# बचत गटांना कृषी प्रक्रिया उद्योगक्षेत्रात वाव- अपर जिल्हाधिकारी अडकुणे

## मविमं जिल्हा सल्लागार समिती बैठक

मराठवाडा केसरी नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर । महिला बचत गटांना कृषी प्रक्रिया उद्योग क्षेत्रात वाव असून त्यात त्यांनी पदार्पण करावे, त्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाने त्यांना प्रशिक्षण, अर्थसहाय्य, बाजारपेठ उपलब्धता करुन द्यावी. जिल्हा वार्षिक योजनेतून द्यावयाच्या निधीसाठीही माविमंने प्रस्ताव सादर करावे,असे निर्देश अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी आज दिले.



महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा सल्लागार समितीची बैठक आज पार पडली. कृषी उपसंचालक दीपक गवळी, सहा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. रमण इंगळे, सहा. मत्स्यव्यवसाय अधिकारी श्रीमती यु.व्ही.पवार, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे सचिन सोनवणे, अजित भामरे. मॅग्नेटचे प्रकल्प अधिकारी अरुण नादरे, माविमंचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड यांच्यासह बॅंक प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात महिला आर्थिक विकास महामंडळाचे २२०३ महिला बचतगट आहेत. त्यात २२ हजार ८७० महिला सभासद आहेत. या महिलांसाठी नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामिण महिला उद्यम विकास प्रकल्प, अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम, राष्ट्रीय नागरी उपजीविकास अभियान, वॉटर सॅनिटेशन कार्यक्रम असे विविध उपक्रम राबविले जाऊन त्यांच्यातील उद्यमशीलतेला चालना दिली जाते. गत वर्षात (सन २०२४-२५) ११६९ बचत गटांना ४४ कोटी १३ लक्ष ४० हजार रुपयांचा पतपुरवठा करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत नवतेजस्विनी उपक्रमांतर्गत वडोद बाजार ता. फुलंब्री, रघुनाथ नगर ता. गंगापूर, शेरेगाव लासूर स्टेशन, बिडकीन ता. पैठण, ब्राह्मणगाव, अन्वी ता. सिल्लोड येथे सुधारीत शेळी पालन व शेळी खरेदी विक्री केंद्र स्थापन करण्याठी , तसेच जीवामृत व द्रव युनिट, दुग्ध व्यवसाय व पनीर उद्योग, मदर पोल्ट्री युनिट स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य महिला बचत गटांना देण्यात आले आहे. तेजस्विनी उपप्रकल्पांतर्गत टेंभापुरी ता. गंगापूर येथे दालमिल युनिट १०० महिला मिळून चालविणार आहेत.

मिरची संकलन व प्रोसेसिंग युनिट, कृषी संच, धान्य क्लिनिंग-ग्रेडिंग युनिट, वेअर हाऊस अशा विविध क्षेत्रात महिला बचत गट कार्यरत होत आहेत, अशी माहिती यावेळी देण्यात आली. या प्रकल्पांसाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीमार्फत राखीव असलेल्या निधीसाठीही प्रस्ताव सादर करण्यात येत आहे,असेही सांगण्यात आले. या सर्व प्रकल्पांसाठी महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना बाजारपेठ लिकिंग करुन द्यावे,असेही निर्देश अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी दिले.


## एम.व्ही.के. ॲग्रो फूड प्रॉडक्ट लिमिटेड

(सीआयएनः L15316MH2018PLC304795)

**रजिस्टर आफिस :** ४४ आणि ४६ कुसूमनगर मु. पोस्ट वाघलवाडा, उमरी नांदेड-४३१८०७, महाराष्ट्र, भारत

**संपर्क क्रमांकः** +९१ ७४४७४६२६०१ | **वेबसाइटः** www.mvkagrofood.com

**ईमेलः** cs@mvkagrofood.com/navinkabra.ca@gmail.com

### अतिरिक्त सामान्य बैठक आणि ई-मतदान माहितीची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की एम.व्ही.के. ॲग्रो फूड प्रॉडक्ट लिमिटेडच्या सदस्यांची असाधारण सर्वसाधारण सभा (ईजीएम) शुक्रवार, २७ जून २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) / इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल. स्पष्टीकरणात्मक विधानासह पाठवलेल्या ईजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी. ईजीएमची सूचना कंपनीच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक फार्ममध्ये फक्त सदस्यांनी प्रदान केलेल्या ई-मेल पत्त्यावर / नोंदणीकृत पत्त्यावर पाठवण्यात आली आहे आणि संबंधित डिपॉझिटरी / रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) / कंपनीने आम्हाला उपलब्ध करून दिली आहे. ईजीएमची सूचना ५ जून २०२५ रोजी पाठवण्याचे काम पूर्ण झाले आहे. ईजीएमची सूचना कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे आणि त्याची वेब-लिंक https://mvkagrofood.com/index.php/egn-notice/ स्टॉक एक्सचेंजची म्हणजेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com आणि एनएसडीएल (रिमोट ई-व्होटिंग सुविधा प्रदान करणारी एजन्सी) ची वेबसाइट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहे.

कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि सेबी (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५ च्या नियम ४४ नुसार, कंपनी सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर, एनएसडीएलने प्रदान केलेल्या ईजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त ("रिमोट ई-व्होटिंग") ठिकाणावरून इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा प्रदान करत आहे. रिमोट ई-व्होटिंगचे तपशील खाली दिले आहेतः (i) रिमोट ई-व्होटिंग मंगळवार २४ जून २०२५ (सकाळी ९:०० वाजता) रोजी सुरू होईल आणि गुरुवार २६ जून २०२५ (सायंकाळी ५:०० वाजता) रोजी संपेल. त्यानंतर मतदानासाठी ई-व्होटिंग मॉड्यूल बंद केले जाईल.

(ii) सदस्यांचे मतदानाचे अधिकार २० जून २०२५ रोजीच्या अंतिम तारखेनुसार कंपनीच्या पेड-अप शेअर भांडवलातील त्यांच्या शेअर्सच्या प्रमाणात असतील.

(i) सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे इक्विटी शेअर्स घेणारी आणि सदस्य बनणारी आणि २० जून २०२५ रोजीच्या कट-ऑफ तारखेला शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती evoting@ nsdl.co.in किंवा cs@mvkagrofood.com वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

(iv) सदस्याने एकदा मतदान केल्यानंतर, त्याला/तिला नंतर ते बदलण्याची परवानगी राहणार नाही.

(v) रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करणारे सदस्य देखील एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.

(vi) श्री. मनीष आर. पटेल, (सीओपीः ९३६०) सुरतचे प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी छाननीकार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. (vii) कट-ऑफ तारखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने एजीएमची सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने मानावी.

ई-मतदानासंदर्भात काही प्रश्न असल्यास, सदस्यांनी http://www.evoting.nsdl.com/ च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या सदस्यांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि सदस्यांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पहावी किंवा नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, चौथा मजला, 'ए' विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, लोअर परळ, मुंबई ४०००१३: ई-मेलः evoting@nsdl.co.in दूरध्वनी क्रमांकः ०२२-२४९९४२०० आणि टोल फ्री क्रमांकः १८००-२२२-९९० येथे संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**एम.व्ही.के. ॲग्रो फूड प्रॉडक्ट लिमिटेड साठी**
**मारोतराव व्यंकटराव कावळे**
**व्यवस्थापकीय संचालक**
**एसीएस क्रमांकः ०६४२१६६२**

**ठिकाण :** नांदेड
**तारीखः** ०५/०६/२०२५



### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मौजे बोरवाडी, ता. भोकर, जि. नांदेड येथील खालील जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी सदर जमीन मिळकतीमधील झाडझुडूप, दगडमाती, बांध व इतर तदंगभुत वस्तू व वहिवाटीचे हक्कासहीत खरेदी देणेकामी आमचे आशिलांशी सदर व्यवहार करण्याचे ठरविले असुन प्रस्तुत मिळकत ही त्यांचे मालकी हक्काची पूर्णतः निर्वेध, निजोखीम, निष्कर्जीव बोजारहित असून विद्यमान मालकांनी तिचे स्वामित्व पणनयोग्य आहे. असा भरवसा व खात्री त्यांनी आमचे आशिलास दिलेली आहे.

शेतजमिन मिळकतीचे वर्णन मौजे बोरवाडी, ता. भोकर, जि. नांदेड येथील गट नंबर जमीन मालकाचे नांव खरेदी क्षेत्र हे. आर (पोट खराबासहीत) ६२ श्री. शंकर रूपसिंग जाधव व इतर ८ हे ८९ आर ६७ श्री. रूपसिंग यमज्या जाधव व इतर १० हे ५० आर तथापी, सदर मिळकत तसेच मिळकतीमधील झाडझुडूप, दगडमाती, बांध व इतर तदंगभुत वस्तू व वहिवाटीचे हक्क यावर सदरील विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लीज, वाटप, बक्षीस, पोटगी, अन्नवस्त्र लांबा, साठेखत, कुलमुखत्यार, वारसाहक्क, विरोधी कब्जा, व्यवस्थापन, अदलाबदल, वहिवाट हक्क, समजुतीचा करारनामा, विसारपावती, करारमदार, खरेदीखत, कोर्टवाद, लीज पेंडन्सी वा तत्सम कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क हितसंबंध, अधिकार वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिष्टर पोस्टाने पाठवुन द्याव्यात अथवा समक्ष भेटून हरकती सादर कराव्यात अन्यथा सदर मिळकत बोजारहित, पणनयोग्य व खरेदी घेणेस योग्य आहे, असे समजुन सर्व संबंधितांनी आपपल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत, असे समजण्यात येईल. व मुदबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

जाहीर नोटीस देणार.
ॲड एस.एस. कुंटे
जिल्हा व सत्र न्यायालय, भोकर
मो. नं ९६९६७२७७७७

ठिकाण : भोकर
दिनांक : ०५/०६/२०२५



### CHANGE IN NAME

I have changed my name.
Old Name:
Shaikh Anjum Bi Shaikh Raheem
New Name:
Anjum Abdul Rahman Shaikh
C/o: Kamal Budhan,
Jatwada, Tal. Aurangabad,
Dist. Aurangabad
Affidavit No.: 389/2025



### CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM
OLD NAME :-
SAYYED AASEFA TABASSUM NAZEER
NEW NAME :-
SAYYAD AASEFA AFROJ
PIPALDARI POST BALAPUR TAL.SILLOD DIST
AURANGABAD


This letter/ News paper was Printer, Publisher by Editor Chhaburao Gopinath Take (Mo. 7798353300 ) office : D 97/18 Shivaji Nagar 11 vi Yojna Aurangabad, 431001 to Solapur Tarun Bharat Media Limited , plot No. Priting Office at A - 14 Railway Station MIDC, Station Road, Aurangabad. RNI No. : MAHMAR/2017/75174, Resident Editor - Ashok Zoting- Office : Supekar Niwas, Delhi Gate Patangan, Ahmadnagar- Mo. 9822510669

या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. बातम्या व इतर मजकुराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत वार्ताहर, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्त संपादक यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाही. (औरंगाबाद) छत्रपती संभाजीनगर न्यायकक्षेत.